दि चिल्ड्रेन्स एड सोसायटी, मुंबई संचलित चेंबूर चिल्ड्रेन्स होम, मानखुर्द येथील संपूर्ण नाल्याभोवती आर.सी.सी.संरक्षण भिंत बांधणेसाठी सन २०१७-१८ या चालू आर्थिक वर्षात निधी वितरित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्र. बीजीटी-२०१७/प्र.क्र.१०६/का-८,
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २७ फेब्रुवारी, २०१८.

वाचा:
१) शासन निर्णय क्र:माहआ-२०१६/प्र.क्र/२३८ का-८ ,दि.१८ नोव्हेंबर .२०१६
२) शासन निर्णय क्र.पूरक-२०१६/प्र.क्र.२९४/का-८, दि .७ मार्च .२०१७
३) शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८ एप्रिल,२०१७.
४) शासन परिपत्रक वित्त विभाग क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दि.३० जून, २०१७.
५) शासन परिपत्रक वित्त विभाग क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.०६ फेब्रुवारी,२०१८.
६) आयुक्त, महिला व बाल विकास विभाग यांचे पत्र क्र. मबाविआ/चिएसो बांधकाम/८९२,दि.१२.०२.२०१८.

प्रस्तावना :

राज्य मानवी हक्क आयोग यांचेकडील प्रकरण क्र.CD case १२१/२०१५ मधील मा. आयोगाच्या आदेशास अनुसरून दि चिल्ड्रेन्स एड सोसायटी, मुंबई संचलित चेंबूर चिल्ड्रेन्स होम, मानखुर्द येथील संपूर्ण नाल्याभोवती आर.सी.सी.संरक्षण भिंत बांधणेसाठी रू. १.८४ कोटी इतक्या अंदाजपत्रकास शासन निर्णय दि. १८.११.२०१६ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. सदर बांधकामासाठीचा खर्च लेखाशिर्ष (२२३५ २२४१), २७, लहान बांधकामे , मागणी क्रमांक एक्स-०१ अंतर्गतच्या तरतूदीतून करण्यात येतो. शासन निर्णय दि. ७.३.२०१७ अन्वये या कामासाठी रू. ४५.०० लक्ष इतका निधी सन २०१६-१७ या मागील आर्थिक वर्षात उपलब्ध करण्यात आला आहे.

चालू आर्थिक वर्षामध्ये लेखाशिर्ष (२२३५ २२४१), २७ लहान बांधकामे अंतर्गत रू. १४२.२० लक्ष अर्थसंकल्पित करण्यात आला असून वित्त विभागाच्या दि. ६.२.२०१८ अन्वये वितरणासाठी रू. १२७.९८ लक्ष (महसूली लेख्यांतर्गत अनिर्वाय खर्चासाठी अर्थसंकल्पित निधीच्या ९० टक्के) इतका निधी उपलब्ध होत आहे. मानखुर्द येथील नाल्याभोवती संरक्षण भिंत बांधकामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सन २०१७-१८ या चालू आर्थिक वर्षासाठी रू. १००.०० लक्षची मागणी करण्यात आलेली आहे. सदर लेखाशिर्षांतर्गत अर्थसंकल्प वितरण प्रणालीवरील नोंदीनुसार रू. ४३.३० लक्ष इतका निधी इतर बांधकामांच्या अनुषंगाने खर्च झाल्याचे दिसून येते. सबब, सदर लेखाशिर्षांतर्गत आता उपलब्ध होत असलेला रू. ८४.६८ लक्ष इतका निधी आणि सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात आलेल्या मागणी विचारात घेऊन दि चिल्ड्रेन्स एड सोसायटी, मुंबई संचलित चेंबूर चिल्ड्रेन्स होम, मानखुर्द येथील संपूर्ण नाल्याभोवती आर.सी.सी.संरक्षण भिंत बांधणेसाठी निधी वितरणाची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

१. आता या शासन निर्णयाअन्वये सन २०१७-१८ या चालू आर्थिक वर्षात, लेखाशिर्ष २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, ८०० इतर खर्च, (०१) (०४) इमारतींची दुरूस्ती (अनिवार्य), (२२३५ २२४१), २७, लहान बांधकामे, मागणी क्र. एक्स-०१ अंतर्गतच्या अर्थसंकल्पिय तरतूदीपैकी वितरणास उपलब्ध होत असलेल्या

तरतूदीतून दि चिल्ड्रेन्स एड सोसायटी, मुंबई संचलित चेंबूर चिल्ड्रेन्स होम, मानखुर्द येथील संपूर्ण नाल्याभोवती आर.सी.सी.संरक्षण भिंत बांधणेसाठी रू. ७०.०० लक्ष इतकी तरतूद आयुक्त,महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांना वितरीत करण्यात येत आहे.

२. उपरोक्त कामाच्या अनुषंगाने सदर निधी संबंधितांना उपलब्ध करून देण्यासाठी प्रचलित नियमानुसार विहीत कार्यवाही आयुक्त,महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांनी करावी. तसेच संरक्षण भिंत बांधकामाच्या प्रगतीबाबत वेळोवेळी आढावा घेण्यात येऊन शासनास अहवाल सादर करावा.

३. सदर रक्कम खर्च करताना राज्य शासनाची कार्यनियमावली, वित्तीय नियमावली व या विभागाच्या तसेच वित्त विभागाच्या वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचनांचे तसेच वित्त विभागाच्या संदर्भाधीन परिपत्रकातील सर्व अटी /शर्तीचे पालन करण्यात यावे.

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या संदर्भाधीन परिपत्रकान्वये प्रशासकीय विभागास प्राप्त अधिकारान्वये प्राप्त झालेल्या सहमतीस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१८०३०११३४९१७९१३० असा आहे. सदरचा निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Smita Dattatray Nivatkar

Digitally signed by Smita Dattatray Nivatkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3fa46cf1e928518ffc98619187a1ef6de2dd57c16934e9cb6672cc02aa258b08, cn=Smita Dattatray Nivatkar
Date: 2018.03.01 13:49:57 +05'30'

(स्मिता निवतकर)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.राज्यपाल, यांचे सचिव,राजभवन,मुंबई
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई .
३) मा.अध्यक्ष/उपाध्यक्ष विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ. मुंबई .
४) मा.सभापती/उपसभापती विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ. मुंबई .
५) मा.विरोधी पक्ष नेता, विधानसभा/ विधानपरिषद,महाराष्ट्र विधीमंडळ.
६) मा.मंत्री (म व बा वि)/ राज्यमंत्री(म व बा वि),यांचे खाजगी सचिव ,मंत्रालय ,मुंबई .
७) सचिव, महिला व बाल विकास विभाग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई.
८) प्रधान सचिव (व्यय),वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई
९) आयुक्त , महिला व बाल विकास आयुक्तालय,म.रा. पुणे.
१०) आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना,नवी मुंबई.
११) महालेखापाल १, महाराष्ट्र राज्य (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता),मुंबई
१२) महालेखापाल २, महाराष्ट्र राज्य (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता),नागपूर
१३) प्रबंधक, राज्य मानवी हक्क आयोग,मुंबई (प्रकरण क्र.१२१/२०१६, दिक्षीत संजीव पुजारी वि सचिव म व बा वि च्या अनुषंगाने)
१४) सर्व उपसचिव ,सर्व अवर सचिव, महिला व बाल विकास. नवीन प्रशासकीय भवन , मुंबई
१५) उपायुक्त (बालविकास) महिला व बाल विकास आयुक्तालय, म.रा.पुणे.
१६) अधिक्षक अभियंता, (सार्वजनिक बांधकाम) मुंबई मंडळ, २५ मर्झबान रोड फोर्ट, मुंबई-०१
१७) कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां) विभाग,दा.नौ.रोड, अंधेरी (प.) मुंबई-५८

१८) कक्ष अधिकारी, वित्त विभाग (व्यय-६/अर्थसंकल्प-७) मंत्रालय, मुंबई -३२
१९) कक्ष अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग (इमारत-१/इमारत-२) मंत्रालय, मुंबई -३२,
२०) मुख्य अधिकारी, दि चिल्ड्रेन्स एड सोसायटी,माहिम, मुंबई
२१) जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी मुंबई शहर/मुंबई उपनगर
२२) सर्व कार्यासने, महिला व बाल विकास विभाग, नवीन प्रशासकीय भवन , मुंबई
२३) निवड नस्ती का-८.